Volume-2 (2021)
Issue-2 (September-2021)
**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173

# धर्म — समाज भेदभावाच्या अगांने मुस्लिम मराठी कविता

**डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज**
मराठी विभाग प्रमुख
एस.एस.गर्ल्स कॉलेज, गोंदिया.(महाराष्ट्र)
9284763884
parthkavita@gamil.com

मुस्लिम मराठी काव्याची सुरूवात प्राचीनतम असून वारकरी, महानुभाव पंथासोबतच हा काव्यप्रवाह बहरत, फुलत होता पण दुर्लक्षित होता. प्रथम 'मुसलमान मराठी संतकवी' या.रा.चि. ढेरे यांच्या पुस्तकातून मुस्लिम मराठी संतकवींच्या प्राचीन मराठी साहित्यातील कर्तृत्वाची यथार्थ जाणीव होते. यु.म.पठाण, जुल्फी शेख यांनीही महत्वपूर्ण संशोधन या क्षेत्रात केले आहे. याशिवाय विभिन्न पुस्तकात थोडाफार उल्लेख आढळतो. या सर्वांच्या विवेचनावरून असे लक्षात येते की मुस्लिम मराठी संतकवींनी सर्वच काव्यप्रकार हाताळले असून काही निवडक काव्यप्रकार आणि निवडक संतकवीच वाचकांसमोर आले आहेत. संत आलमखान शहा, मुंतोजी ब्राम्हणी, किंवा मुर्तुजा कादरी, हुसेन अंबरखान, बाबा शेख मंहमद, शहामुनी, सुलतान शेख, दाजी, शहा बेग, वाजीद पठाण, शकरगंज, शहा नवरंग, शहा हुसेन, जंगली फकीर, सय्यद महंमद, लतिफ शहा, शहा आलम, इब्राहिम खान अनेक संतांची नावे काव्यनिर्मितीकरीता घेता येतात. शाहीरी वाङ्मयात सगन भाऊ, शहा अली, हुसेन खान, शाहीर अब्दूल, आबालाल करीम, गरीब अब्दूल, फातिशा बाबासाहेब महमंद हनीफ, शाहीर अली, फकीर, जाफर नरूरू, लहरी हैदर, रसूल भाई पिंजारी या शाहीरांनी शाहीर वाङ्मयात भर टाकलेली आहे पण वाचकांसाठी, फक्त सगनभाऊ परीचित आहेत. या मुस्लिम संतकवींनी आणि शाहिरांनी आपल्या रचनेत हिंदू—मुस्लिम सांस्कृतिक ऐक्याची भावना व्यक्त केली आहे.

हम कहे अल्ला, तुम कहो देव समजेबिन झूट पराया दावा
तुम कहे राम हम कहे रहिमन दोन्हो विचारो एक खूनमान

ही धार्मिक—सांस्कृतिक एकात्मतेची भावना व्यक्त करताना संबोधन जरी वेगळे असले तरी रूप एकच आहे, भाव एकच आहे, कुठलाही वेगळेपणा नाही गुरूच्या बाबतही हीच भूमिका व्यक्त होते. ''मुसलमानात होऊनिया पिरू। मराठीयांत म्हणती सदगुरू। तोच तारील हा भाव सागरू। येर बुडोन बुडविती।।

धर्मांतरीत मुस्लिम समाजावर धर्माचा प्रभाव असला तरी हिंदूत्वाची स्मृतीही पूर्णत: नष्ट झाली नाही. काही मुस्लिम शासक असहिष्णू आणि परधर्माचा तिरस्कार करणारे असल्यामुळे हिंदू—मुस्लिम अल्ला आणि देव यांच्यात फारकत होत गेली. पण अशी फारकत होत असली तरी सामाजिक एकता, राष्ट्रीय भक्ती संपुष्टात आली नाही म्हणूनच

मुखी नाम माझ्या विठोबा, मला लाविते वेड माझा विठोबा
जगावेगळे भासते रूप त्याचे जगाहून आहे निराळा विठोबा
कशी भेट होईल त्याची कळेणा कुठे मी कुठे पंढरीचा विठोबा
इथे ज्यास आधार नाही कुणाचा अस एक आधार त्याचा विठोबा
(बदीउज्जमॉ खावर—माझिया गझला मराठी पृ.१३)

अशी एकरूपतेची भावना या काव्यप्रकारातून व्यक्त झाली आहे.

केशवसुतापासून आधुनिक मराठी कवितेला सुरूवात झाली असून या नवकाव्याचा प्रभाव जीवनाच्या साहित्याच्या सर्वच पैलूंवर पडायला लागला होता. १९३५ ला सय्यद अमीन यांनी प्रथमत: 'मुस्लिम मराठी साहित्य' हे संबोधन वापरले आणि सर्व मुस्लिम लेखक कवी यांचे साहित्य या संबोधनात जमा होऊ लागले. विशेषत: साठोत्तरी काव्यप्रवाहात मुस्लिम कवींनी भरपूर काव्यरचना केलेली आहे. या कवितांमध्ये सामान्य मराठी कवितेप्रमाणे विविधांगी आशय व्यक्त होत असला तरी एक वेदना सतत आकार घेत असते. ती म्हणजे 'भारत–पाकीस्तान फाळणी' ही फाळणी भारतीय मुस्लिम मनावर झालेली खोल जखम असून ती सतत वेदना प्रसवत असते. पण ही वेदना विद्रोहाच्या अंगाने जात नाही तर नेहमी सामंजस्याचा आशावाद व्यक्त करत राहते. या कवितेत क्रांतीची भाषा जरी येत असली तरी ती धर्माच्या अगांने न येता समाजातील विविध घटनांच्या विचाराने येते. या कवितांचा सामाजिक दृष्टिकोनाने अभ्यास करत असता लक्षात येते की मुस्लिम भावनेलाही सामाजिक एकजीनसीपणाच हवा आहे. 'राजकीय, धार्मिक बाबींमुळे येणाऱ्या वितुष्टतेला नकारात्मक ठरवून सगळे भारतीय नागरीक एकोप्याने नांदून देशाला प्रगतीपथावर नेण्याचा प्रयत्न करावा', हा आशावाद या कवितांमधून व्यक्त होतो.

मुस्लिम मराठी कवितेचा सामाजिक दृष्टिकोनातून विचार करताना मुस्लिम समाजचित्रण, जीवनदर्शन, त्यांच्या सामाजिक जाणिवेचा मूलस्त्रोत, वंशपरंपरेने चालत आलेली जीवनधारणा, धर्मांतरीत मुस्लिम म्हणून निर्माण होणाऱ्या समस्या, समूहाबद्दलची भावना, सामाजिक परिवर्तन, परिवर्तनाच्या दृष्टीने व्यक्त होणारा आशावाद अशा अनेक घटकांचा विचार करावा लागतो. कारण मूळ मुस्लिम धर्मात शिया व सुन्नी हे दोनच वर्ग असले तरी उच्चनिचतेच्या श्रेणी आहेत. मुसलमान म्हटले की फक्त मुसलमान धर्म एवढेच लक्षात येत असले तरी हा वर्ग प्रांतोप्रांती विविध जातीस्तरावर पसरलेला असून जातीस्तरांमध्ये विभाजित झाला आहे. यात मुळचे उच्च, स्थिर धर्मांतरीत, भटके धर्मांतरित, शहरी, ग्रामीण असे ढोबळमानाने पाच वर्ग करता येतात. या वर्गात बहुसंख्यांक ग्रामीण धर्मातरित वर्ग आहे. ज्याचा राजकीय खेळी किंवा धार्मिक अंधत्व यांच्याशी काहीही संबध नाही.

हे ग्रामीण धर्मांतरित भारतीय संस्कृतीतील स्पृश्य–अस्पृश्यतेच्या विषमतेतून धर्मपरिवर्तन करणारे किंवा असहिष्णू शासकांच्या बळजबरीमुळे धर्मांतरित झालेले किंवा हिंदू–रूढी–परंपरांच्या जाचाला कटांळून स्वप्रेरणेने मुस्लिम बनणारे असे वर्ग होत.

कुठल्यातरी वेदनेच्या वारशाने उद्ध्वस्त केले असतील,
जोखडदंड ब्राम्हणी संस्कृतीचे आणि बएत घेऊन झाला असेल
'अल्लाहू–अकबर' चा वारसदार
एका श्रेणी अंत्यज फुत्कारून उठला असेल
फेकून गळयातील मडके अन गांडीला बांधलेला फडा
शिरला असेल वस्तीत सिंहासारखा होतात घेऊन कुराण
(जावेद कुरैशी, बएत, पृ.२२)

हिंदूच्या मुस्लिम धर्मांतराचा इतिहास सांगणारी ही कविता शुद्र, तळागाळातील वर्ग विविध जाती–उपजाती यांनी आपली अस्पृश्यता, शुद्रत्व नष्ट करण्यासाठी स्वत:च्या संस्कृती आणि अस्मितेसह धर्मांतर करून मुस्लिम झाले. ब्राम्हणी संस्कृतीमुळे अस्पृश्यांना जे अन्याय–अत्याचार माणूस म्हणून नाकारले पण भोगावे लागले त्याचा परिणाम म्हणजे धर्मांतर होय. मुस्लिम धर्म स्विकारल्यामुळे धार्मिक

शुद्रत्व नष्ट झाले असले तरी त्यांच्या उदरनिर्वाहाचे व्यवसाय तसेच राहिले. उदरनिर्वाहाच्या व्यवसायासोबत चिकटलेल्या जातीही तशाच राहिल्या त्यामुळे मूळ मुस्लिम धर्मात नसलेल्या जाती निर्माण झाल्या आपोआपच त्यामागे जाती भेदही अस्तित्वात आला.

जाती–उपजातींनीच–सर्व धर्म बाटलेत
वर जाणवत नाहीत आत मात्र फाटलेत
वस्तीलाच मस्ती आहे – माणसाला जाळायची
मुठीला का इच्छा रामपूरी पाळायची
(सय्यद अल्लाउद्दीन–झिंदाबाद, मुर्दाबाद, पृ.११४)

अशा जाती–उपजाती निर्माण होऊन समाजिक विषमता निर्माण करतात, जातीभेद उदयाला येऊन एकसंघ समाजात दूही निर्माण होते म्हणून या जाती–उपजातींना थारा देऊ नये.

नका प्रांताप्रांताचे आपसात वाद, भाषाभाषांचे नका जाजवू निनाद
चातुर्वर्णांना येथे सहारा नको कित्येक जातीचा पसारा नको
(जब्बार पटेल, एकात्मता, पृ.१४)

प्रांताप्राताच्या भेदामुळे म्हणजे फाळणीमुळे जो भेदाभेद निर्माण झाले त्यामुळे भाषाभेदही उदयाला आला. फाळणीने धार्मिक भावना उफाळून आली आणि आता तर आर्थिक विषमताही निर्माण होऊ लागली. धर्म, जात यांच्यातील तेढीमुळे नुकसान फक्त सामान्य मनुष्याचे होते. समाजातील जो उच्चभ्रू वर्ग आहे तो सर्वच बाबतीत सुरक्षित असून मुल्लामौलवी व राजकारणीही मजेत आपला स्वार्थ साधून घेतात.

जाती धर्मातील असो देशप्रदेशातील असो
मुल्ला पंडितातील असो पक्षापक्षातील असो
मारली जातात फक्त हातावर पोट असणारी सामान्य माणसं
(मुबारक शेख, दहशतनामा पृ.४३)

जातीसकट विषमता आलेल्या समाजाची अनेक बाजूंनी मुस्कटदाबी केली जाते. त्यांची अशी स्थिती का झाली हे सांगताना राजेखान शानेदिवाण म्हणतात, ''भारतीय समाजव्यवस्थेत इस्लाम रूजला पण हे रूजणे भारतीय मानसिकतेच्या अंगाने घडले. त्यामुळे भारतातील मुस्लिमांनी इस्लामचा स्वीकार सोयीनुसार केला. भारतीयांसाठी इस्लाम हा परकीय धर्म स्वाभाविकपणे स्थानिक हिंदूच्या धर्मांतराने येथील मुस्लिम समाजाने आकार घेतला. यावर हिंदूतील जातीव्यवस्थेचा प्रभाव मोठया प्रमाणात आहे. हिंदू धर्माने जातनिहाय व्यवसायाची निश्‍चिती केली तीच पध्दत मुस्लिमांमध्ये राहिली त्यामुळे धर्म बदलला, पण व्यवसाय मात्र जुनाच राहिला. यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या.'' या समस्यांना धर्ममार्तडांनी, राजधुरीणांनी खतपाणी घालून घालून विस्तारीत करून सामान्याची मनं कलूषित केली. मुसलमान–हिंदू हा धार्मिक भेद माजवून आपसात वाद निर्माण केला.

मुसलमान मुसलमान यह हो जावो!
न मय रयता महफूज तूम मर जावो
आता ये मारते तुले त ब्रिदराने इस्लाम घाबरते कायले ?
कातील ले तुया रोजा आफरातीले बोलावीन
थ्यो मले चारल न म्या थ्याले चारीन

बेस बेस हदीस न झकास झकास पुराण
थ्यो मले सांगल न म्या थ्याले सांगीन
आमालेच मालूम हाये 'सच्चा समभावो'
पर तुमी पाच वेळा 'काफिरे–ला–ऐतबार' पढते जावो
मस्जिदीच्या समोर त्याइचा बाजा नको
संदल असल आपलात बिलकूल थांबवू नको
(जावेद कुरैशी, बएत पृ.५२–५३)

उच्चभ्रू, मुल्ला–मौलवी, मुसलमान वर्ग हा सामान्य अर्जल मुसलमानांना धर्माच्या नावाने हिंदू–मुस्लिम धर्मातला तात्विक नव्हे तर भ्रामक फरक सांगून इतिहासाची विकृती दाखवून संघटीत व्हायला सांगतो. धर्माच्या नावावर एकी होऊ दयायची नाही हा हेतू साध्य करण्यासाठी उच्चभ्रू वर्ग हदीस–पुराण ऐकवून, खुदबा सांगून, ईदमिलन सारखे संमेलन करून सामान्यांना धार्मिकतेला बांधून ठेवण्याचे भरकस प्रयत्न करतात. स्वत: मात्र हिरव्या झेंडयाला भगवा झेंडा बांधून, सर्वधर्म समभाव सांगून आपले स्थान सुरक्षित ठेवतात म्हणूनच अजीम नवाज राही म्हणतात,

मौलवी अजान आणि ताळेबंद
ईदच्या दिवशी कडकडून मिठी मारून
सदिच्छा देणाऱ्यांची तपासली मने
तर आपल्या अस्तित्वनाशाच्या येतात हाती योजना
म्हणून आजकल मी केलीत बंद परिचयाची कवाडे
(अजीम नवाज राही, व्यवहाराचा काळा घोडा, पृ. २९)

धार्मिक कृत्यांच्या वेळी संपूर्ण समाज एकत्र येत असला तरी त्यांच्यात एकी नाही हे काही सुजाण मुस्लिमांच्या लक्षात येते पण त्यांनाही हा उच्चभ्रू, मुल्ला मौलवी, राजकारण्यांचा वर्ग आपले विचार व्यक्त करू देत नाही त्यांना खरा धर्म माहित असूनही आपल्या रोजीरोटीच्या दुकानाकरीता धर्माचा खरा खोटा वापर करून बहुजन समाजात अंधश्रध्दा निर्माण करणे, धर्माची खोटी भिती दाखवणे हे सतत चालत असल्यामुळे बहूजन मुस्लिम समाज मागासलेलाच आहे. एका बाजूला धर्माची खोटी भिती आणि दुसरीकडे आपल्याच समाजाकडून परकेपणा वाटयाला येतो.

ते पुजारी संत बाबा थाटली त्यांनी दुकाने
अंधश्रध्देची विषारी हे विचारे भांग प्याले
छावणी सोडून आता शोधण्या चारा नवा हे राजधानीला निघाले.
(कलीम खान, कलीमच्या कविता पृ.१५)

असे हे सतत घडत असल्यामुळे सामान्य मुस्लिम समाज अधिकाधिक हतबल होत आहे. समाजाची धारणा धर्मापासून बनलेली असते आणि प्रत्येक वर्गाला आपल्या धर्म, रूढी, परंपरा, प्रिय असतात पण अशा फोल धर्म भावनेमुळे श्रध्देची फलश्रूतीही खोटी ठरत असते.

उगवणारा प्रत्येक श्रध्दाळू दिवस करीत असतो
नियमित नमस्कार, नतमस्तक होऊन काळाला आळवित
बरसत असतो ऊन, वारा, पाऊस होऊन
तुकारामाच्या अभंगासारखा (खलील मोमीन, निरालय, पृ.३०)

आध्यात्मिक ओढ सर्वच श्रध्दाळू मनाला असते पण धर्माच्या नावावर मानवतेला श्रध्देला आरपार तडे जाणाऱ्या घटना घडत जातात आणि आशावादी श्रध्दा निराशावादी बनत जाते. असे असले तरीही हिंदू–मुस्लिम ही भावना सामान्य जनांच्या मनात नसल्यामुळे अनेक ठीकाणी सामाजिक अभिसरणाचे चित्रण करणाऱ्या कवितांनी सामाजिक एकतेचे वर्णन केले आहे.

महाराष्ट्रामध्ये बहुजन समाजाला पुजावे लागते कुलदैवताला
काळुबाई खंडोबा म्हसोबाला बकरे कापण्याचा अधिकार मुसलमानाला
बकरे कापताना नाव काय घेतीला
बोलणार नाही काळूबाई खंडोबा म्हसोबाला
बिसमील्लाह–अल्लाह अकबर म्हणोनि
सुरा फिरवला हिंदूचा देव जागृत झाला. (बादशहा सैय्यद, सुचल्या पृ.३८)

सामान्य मराठी व्यक्तिसारख्या ग्राम दैवतांच्या प्रथा, व्रत–वैकल्प पार पाडून त्याला मराठी संस्कृती बद्दलची भावना व्यक्त केली जाते. वंश परंपरेनुसार, रूढी धर्मानुसार मराठी मुस्लिम समाजात ज्या धारणा आहेत त्यातील काही बाबी कशा चुकीच्या आहेत, त्यामुळे समाजाचे कसे नुकसान होते आहे याचेही चित्रण आहे.

सुन्ता, बुरका, तलाक, बालविवाह प्रथा, रमाजान, रोजे, नसबंदी विरोध, स्त्रीचे दुय्यम स्थान, बहू विवाह प्रथा, अजान, नमाज, मनसल्वा, जन्नत, जहन्नम या सर्व बाबी सामाजिक जीवनात इतक्या खोल रूजल्या आहेत की यामुळे मुस्लिम समाज कट्टर बनतो. वास्तविक काळ बदलला की समाज धारणा बदलणे गरजेचे असते, त्या बदलल्या नाही तर समाज विकासाला अडसर ठरतात.

तुम्ही सवारी संदल काढा
ढोलतोशे वाजवा दर्ग्यावर जा अन् कव्वाली गा
पिढयान् पिढयांपासून तर शतकांपर्यत
आमच्या पूर्वजांनी दिलेला तो गृहपाठ अखंड चालू ठेवा.
(मन्सूर एजाज जोश, जेरबंद)

वंशपरपरेने चालत आलेल्या वडिलोपार्जित चुकीच्या प्रथांना मुस्लिम समाज आजही काटेकोरपणे पूर्ण करण्यातच धन्यता मानतो. कधीकाळी गरजेनुसार पडलेल्या या प्रथा धर्माच्या अज्ञानापोटी, रिकामपणापोटी चालू ठेवण्यात आल्या असाव्यात पण आज मात्र वशांची ओळख बनलेल्या आहेत.

रमझान बकर ईदेला सजतो मोहल्ला नवरीसारखा
विसरून सालभरातले काबाडकष्ट
घमघमतो वारा अत्तराचा सर्वत्र
किंवा
नाचतो मोर्हरम मिरवणूकीत एका पायावर गफ्फार लंगडा
पर्वा उदयाची न करता ऊधळतो कव्वालावरून नोटा
रसिक एखादा कलंदर विकून बकरी लाडकी
मागतो उजाडल्यावर चहा
वळणावरच्या हाटेल वाल्याला उधार
(अजीम नवाज राही – कल्लोळतला एकांत पृ.१२३)

सामाजिक रीती कूरीती पाळत, शिक्षण न घेता मुल्लामौलवींच्या आधिपत्याखाली राहून जीवन कंठणाऱ्या समाजाची अवदया अगदी हलाखीची होते. हातठेले ओढणे, रिक्शा चालवणे, वेठबिगार करणे याशिवाय दुसरे काहीही करता येत नाही. अशा मागासलेल्या समूहात आणि उच्चशिक्षित समूहात आपोआपच स्तरभेद निर्माण होतात. उच्चशिक्षित समाजाशी दूरावा निर्माण होतो, महत्वाचे म्हणजे उच्चशिक्षित झाल्यावर आर्थिक स्तर वाढला की हा बहूजन समाजच आपल्या लोकांपासून दूर जातो.

इथला प्रत्येक शुद्र बहूजन दोन पैसे आले की
उच्च होण्याच्या प्रयत्नांत गुंतत जातो
तेव्हा ही व्यवस्था त्याला नकळत
त्याच्या शूद्रत्वाची जाणीव करून देत रहाते.
खजिल होऊनही ते परत परत उच्चतेच्या
मोहाला बळी पडत जातो
म्हणून तो बहुपदरी व्यवस्थेचे जोडे खात खात जगत रहातो
'हम धेड है जीम के पेड है' असे त्याला मुळीच वाटत नाही
(फ.म. शहाजिंदे, आम्ही शुद्र बहूजन पृ.८८)

ही एक तत्कालीन सामाजिक समस्या आहे की आपलेच माणसे आर्थिक सक्षम झाली तर आपल्या समाजापासून दूर जातात, आपलीच समाजभावंड दु:खात, दारिद्रयात पिचत असल्याचे पाहूनही समाजप्रबोधन करत नाही की आधार देत नाही. कधीकाळी अत्यंत आनंदी वातावरणात असलेल्या गावात आता हे भेदाभेद, भीतीयुक्त वातावरण असतं. दिवसा गजबजलेलं वाटणार गाव रात्री मात्र भूतासारखं भासतं.

एक गाव वसलेलं गोकुळासारखं गजबजलेलं,
अंगणातील तुळशींनी सजलेलं
रात्री हे गाव भूताचं असतं अन् दिवसा खोटया मुखवटयाचं
नात्यागोत्याचा विचार या गावचा नाही
कटया फुलांचा बाजार या गावचा आहे
रात्रीचे दिवे इथे लावतच नाही
दूर वेशेपर्यंत प्रकाशच नाही
सकाळी उठून पाहावं तर साऱ्या तुळशीच्या मंजिऱ्या
जमिनीवर सांडलेल्या अस्ताव्यस्त विखरलेल्या
(नसीम पठाण, ऋतूगंध पृ. २१)

धार्मिक—सामाजिक भेदभावांमुळे गावाची स्थिती वरवर आनंदी वाटत असली तरी आत मात्र अत्यंत उदासीन आहे. अशाप्रकारे समाज—दर्शनासोबतच मुस्लिम धर्मिय म्हणून, मुसलमान म्हणून वाटयाला आलेल्या अनेक तिरस्कृत अनुभवांचे अवहेलनेचे चित्रण या कवितांमधून व्यक्त झालेले आहे. धर्माची आग पेटवून मात्र सर्व समुदायांशी, धर्माशी लढा द्यायला प्रेरीत करणारे धर्मधूरीणे समाजाला वेगळया पातळीवर आणयचा प्रयत्न करतात आणि सामान्य जनता त्याच्यांच दाखविलेल्या वाटेवर चालत असते अशा अवस्थेत समाजपरीवर्तन कसे होणार म्हणूनच वेगळी दृष्टी असणे आवश्यक आहे.

डोळे त्यांना दृष्टी दे वाणी त्यांना विवेक दे

दिलीस तर एक सतत प्रक्रियेची आस दे (जुल्फी शेख, मी कोण ?)

अशी मागणी निर्माणकर्त्याकडे केली जाते. समाज जर नव्या दृष्टीने विचार करू लागला तर धर्माचे बुरसटलेले, समाजाचे शृंखलेसारखे जकडणारे विचार नष्ट होतील आणि समाज प्रकाशाच्या वाटेवर जाण्यास उद्‌धृक्त होईल अन्यथा समाज अलिफ, बे, से ते हेच वाचत राहतील व फक्त धार्मिक विचारांच्या पलिकडे विचार करणार नाही.

अशा अनेकविध धर्मभेदाच्या आणि समाज भेदभावाचे अनेक पैलू मुस्लिम मराठी कविता व्यक्त करते. मानवाला केंद्रस्थानी ठेवून समाज, धर्म, वंश, परंपरा यांना मानवाच्या गरजेनुसार महत्त्व दिले पाहिजे असा संकेत देणारी व केशवसुतांच्या पंरपरांशी नाते जोडणारी ही कविता धार्मिक व सामाजिक विषमतेचे दर्शन घडवते. मूळ मुस्लिम धर्मात नसलेल्या जातीस्तराच्या भेदभावाची, विषमतेची खंत व्यक्त करताना संपूर्ण भारत समाज एकसंघ असावा आणि चूकीच्या, जाचक रूढी, प्रथा नष्ट होऊन भ्रष्टाचार, अंधश्रध्दा सारखे घटक मूळातून उपटून काढण्याची भाषा, मुस्लिम मराठी कविता व्यक्त करते. धर्मातील मागे खेचणारे जे जे घटक आहेत. त्या सर्वाचा पूर्नविचार करून नष्ट करणे किंवा काळानुसार बदलते रूप देणे आवश्यक असून याकरीता नवीन पिढीने निर्णय घेतलाच पाहिजे म्हणून, नव्या पिढीने निर्णय घेतलाच जीव गेला तरी चालेल मांजरीच्या गळयात घंटा बांधायची'' असा ठाम निश्‍चय करून म्हाताऱ्यांचे न ऐकता जीवनवाट ठरवली पाहिजे असे आव्हान मुस्लिम मराठी कविता देते.

**संदर्भ :**

१) बदीउज्जमॉं खावर, माझिया गझला मराठी.
२) जावेद कुरैशी, बएत, युगसंवाद प्रकाशन, नागपूर.
३) सय्यद अल्लाउद्दीन, झिंदाबाद, मुर्दाबाद, दिलजान प्रकाशन, आष्टी १९९८.
४) सय्यद जब्बार पटेल, एकात्मता शब्दांगार प्रकाशन, हिंगोली, १९९४.
५) मुबारक शेख, दहशतनामा, विजय प्रकाशन, नागपूर, २०११.
६) अजीम नवाज राही, व्यवहाराचा काळा घोडा, मुक्तछंद प्रकाशन, नागपूर, २००४.
७) कलीम खान, कलीमच्या कविता, प्रगत प्रकाशन, आर्णी, २००४.
८) खलील मोमीन, निरालय, चेतश्री प्रकाशन, अमंळनेर, १९८२.
९) बादशहा सय्यद, सुचल्या, नवजीवन प्रीटींग प्रेस, पुणे.
१०) मन्सूर एजाज जोश, जेरबंद अनु. लोकनाथ यशवंत आंबेडकरी साहित्य प्रबोधिनी, चंद्रपूर २००३.
११) अजीम नवाज राही, कल्लोळातला एकांत, अक्षरमानव प्रकाशन, पुणे २०१२.
१२) फ.म.शहाजिंदे, झोंबणी, भूमी प्रकाशन, लातूर, २०१३.
१३) जुल्फी शेख, मी कोण ? युग संवाद प्रकाशन, नागपूर, २००१.